ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# वैदिक कालखंडातील स्त्रीजीवनविषयक विचार

* गौरी हेमकांत गायकवाड ,

* संशोधक विद्यार्थिनी, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. 07

प्रास्ताविक :

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत ईश्वर पुरुष स्वरूपात मानण्यात आला असला, तरी त्याच भूमीत 'अर्धनारीनटेश्वर'च्या संकल्पनेत ईश्वराच्या स्वरूपात पुरुषाबरोबरीने स्त्रीला स्थान देण्याचा आग्रह धरणारा मातृप्रधान समाज होता.

1 वेदपूर्व काळात पुरुषांप्रमाणे स्त्रियांना धर्मकृत्य आदी सर्व संस्कारांचे अधिकार होते. वेदातील अनेक सुक्ते स्त्रियांनी लिहिली आहेत.

2 साधारणतः आठव्या वर्षापासून मुलांचे वेदाध्ययन सुरु होई. वेदाध्ययन करणाऱ्या स्त्रियांमध्ये सद्योद्वाहा आणि ब्रम्हवादिनी असे दोन प्रकार होते. सद्योद्वाहा विवाहापर्यंत अध्ययन करत, ब्रम्हवादिनी अविवाहीत राहून अखंड ज्ञानोपासना करत. गार्गी, मैत्रयी, सुलभा यासारख्या स्त्रियांनी शिक्षक, तत्त्वज्ञ, वादविवादपटू म्हणून आपला ठसा उमटविला आहे. पण भारतीय स्त्रियांच्या सन्मानाचा हा इतिहास काही स्त्रियांपुरताच मर्यादित होता असे दिसून येते.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

वेदपूर्व काळात कुटुंबसंस्था पुरुषाच्या हाती होती. स्त्रीच्या पावित्र्याची संकल्पना आजच्यापेक्षा वेगळी होती. वेदकाळातील जीवन स्त्री अतिशय महत्त्वाचे व उच्च दर्जाचे असून वेदकाळातील स्त्रियांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा विकास झालेला होता. पुरूषाप्रमाणेच स्वतंत्र, बौद्धिक आणि आध्यात्मिक जीवन स्त्रिया जगत होत्या. लहानपणापासूनच मुलांच्या बरोबरीने शिक्षण दिले जात होते. मुलांप्रमाणेच उपनयन संस्कार देखील स्त्रियांचा होत होता. या संस्कारानंतर वेदाध्ययनास सुरूवात होत होती. 'वैदिक सुक्ते आणि नित्य–नैमित्तिक कृत्यांना लागणारी सूत्रे त्या मुखोगत करीत.' 'पुरूषांप्रमाणेच त्या सकाळ संध्याकाळ संध्या करी'3 म्हणजेच त्या काळात पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षण दिले जात होते असे समजते. राजकारणातील व त्या घराण्याशी संबधित

असलेल्या घरातील स्त्रियांना शासनविषयक व युद्धकलाविषयक शिक्षण दिले जात असे. वेदकालात बऱ्याच स्त्रिया सुशिक्षित होत्या. त्यांच्यापैकी काहींनी अध्यापनाचे कार्य केले. अध्यापनाचे कार्य करणाऱ्या स्त्रियांमध्ये विधवा स्त्रियांचाही सहभाग होता. पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही अध्यापनाचा व्यवसाय करत होत्या. 'हजार शिक्षकांपेक्षा पिता श्रेष्ठ व त्यापेक्षा हजार पटींनी माता श्रेष्ठ गुरू समजावी'4 असा विचार जोशी महादेव शास्त्री आणि पद्मजा होडारकर यांनी मांडलेला आहे.

अशा प्रकारे माता हजार पटींनीश्रेष्ठ गुरु मानली जाई. याचे कारण स्वतंत्र विचाराच्या, वेदाध्ययन केलेल्या, सुसंस्कृत स्त्रिया आपल्या मुलांच्या भविष्याचा विचार करुन मुलांना शिकवीत. व्यक्तिविकास, कर्तव्यदक्षता, शीलसंवर्धन आणि उत्तम गुणवत्तेचा परिपोष तत्कालीन स्त्रियांकडे असल्यामुळे एखाद्या घरात विद्वान स्त्री असणे, हे प्रतिष्ठेचे मानले जात होते आणि तशीच प्रतिष्ठा समाजातून मिळत होती. वैदिक काळात वैवाहिक जीवनाबद्द्ल त्या काळातील समाजाला आस्था होती. त्यामुळे उत्तम संस्कार व उत्तम शिक्षण घेतलेली मुलगी आपल्या पतीची निवड करण्यास स्वतंत्र होती. डॉ. सरोजिनी बाबर या संदर्भात लिहितात, ''त्या काळची विवाहसंस्था उच्च दर्जाची होती. कन्येला योग्य वर शोधण्यात पिता काळजी घेत असे. प्रौढ वयात विवाह होत आणि वधूवर प्रार्थना करीत की, सर्व देव आमची हृदये एक करोत.''5 पण विवाह झालाच पाहिजे अशा प्रकारचे बंधन नव्हते. अशा प्रकारे नीती–अनीतीची बंधने तीव्र स्वरुपाची नव्हती. यावरुन लक्षात येते की, वेदकाळातील विवाहसंस्था उच्च दर्जाची होती.

प्राचीन काळात स्त्रीला अनेक पती असणे किंवा एका पतीस अनेक स्त्रिया असणे या गोष्टीस परवानगी होती. त्यामधून वंश चालावा म्हणून केवळ नियोग पद्धती, त्या काळात होती.6 वेदकाळात स्त्रीला जर दुर्दैवाने वैधव्य प्राप्त झाले तर तिच्या पसंतीने तिला दुसरा विवाह करण्याची परवानगी होती. याबाबतीत वैदिक काळातील समाज हा उदारमतवादी होता, हे दिसून येते. वेदकाळात विधवेला अतिशय सन्मानाने जगता येत असे आणि समजाकडूनही तिला सन्मानाने वागविले जात होते. तिचा पुनर्विवाह हा तिच्याच मर्जीनुसार होत होता. मात्र तिला पुनर्विवाह करायचा नसेल तर कोणतेही बंधन तिच्यावर नव्हते. जीवन जगण्याचे तिला स्वातंत्र्य होते. आधुनिक हिंदू विधवा स्त्रीप्रमाणे तिला केशवपनही करावे लागत नव्हते.

यावरुन स्पष्ट होते की, वेदकाळात स्त्री स्वातंत्र्य होते. वेदाभ्यास, वेदाध्यान, कलाशिक्षण, वादन,

ISSN-2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume-XI, Special Issue- I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

नृत्य, चित्र आदी कलांचे शिक्षण तिला दिले जात होते. यावरुन तिचे वेदकाळातील स्वातंत्र्यही लक्षात येते. स्त्रियांमधील अपत्य निर्मितीचे अलौकिक सामर्थ्य, अपत्यनिर्मिती प्रकियेतील पुरुषाचे स्थान अनिश्चित, स्त्रियांनी लावलेली शेती, कुंभारकाम यासारखे विविध शोध स्त्रियांनी लावल्यामुळे मातृसत्ताक पद्धतीत स्त्रीचे महत्त्वपूर्ण स्थान होते. स्त्रीच्या प्रजोत्पादनाला दैवी शक्ती म्हणून पाहणाऱ्या पुरुषाला स्वतःच्या क्षमतेची माहिती झाल्यानंतर त्याने स्त्रीला प्रजोत्पादनाचे साधन समजून तिच्यावर अधिकार दाखविण्यास सुरुवात केली. तेव्हापासूनच पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा उदय झाला. असे रचना माने यांनी आपल्या 'स्त्रीवाद' या पुस्तकात म्हटले आहे.

विवाहसंस्थेच्या उदयानंतर वंश सातत्याच्या संकल्पनेला सुरुवात झाली. वंशसातत्य व खाजगी मालमत्तेचा वारस या संकल्पनेतून एका पुरुषाची एका स्त्रीवर मालकी प्रस्थापित झाली. पुरुषसत्ताक समाजरचनेतून आलेली कुटुंबव्यवस्था हीच स्त्री स्त्रातंत्र्याच्या मार्गातील बंधने निर्माण करण्यास महत्त्वाची ठरली. स्त्रीचे शरीर हे एकाच पुरुषासाठी या वस्तुस्थितीमुळे लैंगिक पावित्र्याशी संबंधित संकल्पनांचा उदय झाला. स्त्रीचा श्रमशक्ती, तिची जननक्षमता, लैंगिक क्षमता यांच्यावर पुरुषाचे वैयक्तिक स्वरुपाचे वर्चस्व निर्माण झाले. त्यामुळे परिणामतः सामाजिक व्यवहारातून स्त्रीचे अस्तित्व नाहीसे झाले.

वैदिक काळ रामायण, महाभारत, पुराणकाळ या सर्व काळामध्ये स्त्रीजीवनाची कर्तव्ये संतती संवर्धन व गृहकर्तव्य दक्षता यातच होती. रामायण, महाभारत तसेच पुराणकालीन साहित्य यांमधून निर्माण होणारी स्त्रीची प्रतिमा, पतीव्रता, वत्सल, त्यागी पतीच्या अस्तित्वात स्वअस्तित्व विसरलेली, सांस्कृतिक आदर्शांच्या जपणुकीसाठी वाट्टेल तो त्याग करणारी अशीच निर्माण केलेली आहे.

राजघराण्यांमध्येही काही कर्तबगार स्त्रियांनी राज्यकारभार चालविलेला आहे. पती निधनानंतर सैन्यनेतृत्व करून लढा देणारी कुर्मादेवी, राज्यकारभाराची धूरा स्वीकारणाऱ्या कोल्हापूरची ताराराणी तसेच अहिल्याबाई, शत्रूशी लढताना वीरमरण पत्करणारी राणी लक्ष्मीबाई, रझिया सुलतान, जिजाऊ अशा कर्तबगार स्त्रियांनी आपले कर्तव्य दाखविल्याचे दिसते. अशा प्रकारे ज्या प्रांतात शिस्त व समाधान, शेतीची भरभराट, व्यवस्थित दिसली त्या ठिकाणी स्त्रिया प्रशासक असल्याचे निरीक्षण ब्रिटिश अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे.8 अशा प्रकारे स्वतंत्र स्थान दाखवून

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

कर्तृत्वसंपन्न स्त्रिया त्या त्या कालखंडात होऊन गेल्या असल्या तरी त्यांचे प्रमाण अल्पच आहे. या अल्प स्त्रिया वगळता इतर बहुसंख्य स्त्रिया धार्मिकतेच्या व रूढी परंपराच्यात बंदिस्त झालेल्या होत्या. स्त्रीला माणूस म्हणून स्थान नसणाऱ्या या समाजात सर्वकाळात पुरुषांची बंधने राहिली. वेगवेगळ्याा कालखंडात उत्पादन पद्धती, साधनांचे स्वरूप बदलत आहे. तरीही घर, कुटुंब आणि संपत्तीवर, कुटुंबाच्या उद्योगात स्त्रीने केलेल्या श्रमावरही सदैव पुरुषाचेच नियंत्रण व वर्चस्व राहिले. अशा प्रकारे वेदकाळातील स्त्रीया आणि आजच्या काळातील स्त्रीयांचा विचार केला तर असे लक्षात येते की आजच्या स्त्रियांपुढे स्वतःच्या मुलांना संस्कार करून एक आदर्श नागरिक निर्माण करणे वाटते तितके सोपे काम नाही. आज काळ बदलला, आव्हाने बदलली आहेत. पूर्वीच्या काळी स्त्रियांपुढे वेगळी समस्या व आव्हाने होती. पण आता त्याचे स्वरूप बदललेले आहे. तरीसुद्धा आजची स्त्री स्वतःचा विचार करते त्याचबरोबर कुटुंबाचा, समाजाचा, देशाचा, राष्ट्राचा विचार व विकास करत आहे. त्यामुळे तिची स्वतःची, कुटुंबाची व समाजाची प्रगतीच झाली. कालच्या स्त्रियांमध्ये हे गुण होते. पण ते व्यक्त करण्याची दिशा नव्हती. तरीपण स्त्री आपल्याबरोबर आपल्या देशाची प्रगती करत आहे.

संदर्भग्रथं:

- सांळुखे, आ. ह., 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', लोकवाङ्मयगृह, मुंबई, तृतीय आवृत्ती, 1998, पृ. 145–146.
- बाबर सरोजिनी, 'स्त्रीशिक्षणाची वाटचाल', प्रथम आवृत्ती, मुंबई, 1968. पृ. क्र. 32.
- जोशी महादेवशास्त्री, पद्मजा होडारकर, 'भारतीय संस्कृति कोश', खंड 10 प्रथम आवृत्ती पुणे 1979. पृ. 195.
- बाबर सरोजिनीः 'स्त्रीशिक्षणाची वाटचाल', प्रथम आवृत्ती, मुंबई 1968, पृ. 34.
- पूर्वोक्त पृ. 37.
- बाळ शरयू, 'भारतातील थोर स्त्रिया', पुणे प्रकाशन, प्रथम आवृत्ती पृ. 12

**Cite This Article:**

*गौरी हेमकांत गायकवाड, (2022)* वैदिक कालखंडातील स्त्रीजीवनविषयक विचार, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 178-181.*